Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
C. K. THAKUR VIDYALAYA, NEW PANVEL
ENGLISH MEDIUM - SECONDARY SECTION

Plot: 8, Sector: 14, Janardan Bhagat Marg CIDCO Colony, New Panvel, TN: 27463729, E-mail: ckteshm@gmail.com

School Code / Index: (1) HSE & NTSE: **1403039**; (2) U-DISE: **27240818843**; (3) SSC: **17.01.017**

Date: 19/07/2025

## ''सी. के. ठाकूर इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी घेतला 'राष्ट्रीय खेल दिनाचा आनंद'

दि. १९ जुलै हा दिवस देशभर राष्ट्रीय खेल दिन म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय खेल दिनाचे महत्व विद्यार्थ्यांना माहिती व्हावे म्हणून पहिल्यांदाच हा खेल दिवस सी. के. टी मध्ये साजरा करण्यात आला.

सी.के.टी इंग्रजी माध्यमाच्या पर्यवेक्षिका सौ. निरजा अदुरी मॅडम यांच्या शुभहस्ते खेल दिना निमित्त आयोजित केलेल्या विविध इनडोअर गेमचे जसे कॅरम, बुध्दिबळ, लंगडी, दोरीउड्या या खेळांचे उद्घाटन करण्यात आले. इ. ५वी क च्या ईशानी या विद्यार्थिनीने इनडोअर गेम्स बद्दल अतिशय सुंदर माहिती दिली. तर अर्णव या विद्यार्थ्याने बाह्य खेळ जसे क्रिकेट, कबड्डी या खेळाबद्दल माहिती दिली. इ. ५ वी क श्रीराज या विद्यार्थ्याने 'खेळ आणि आपले आरोग्य ह्या विषयांवर सुंदर माहिती दिली.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. संतोष चव्हाण सर यांनी दिलेल्या स्फूर्तीमय विचारांनी विद्यार्थ्यांच्या मनात खेळाबद्दल आणि आपल्या आरोग्याबद्दल जागृती निर्माण झाली.

सौ. पूर्वा खेडेकर यांनी श्री. अशोक पाटील सर व श्री. प्रकाश रिसबूड सर यांच्या मार्गदर्शनाद्वारे या दिवसांचे आयोजन केले या कार्यक्रमासाठी सौ. स्नेहा पाटील व रूपेश मढवी या शिक्षकांचे विशेष सहकार्य लाभले.

शारिरिक शिक्षण विभाग प्रमुख श्री अशोक पाटील सर, तसेच श्री रिसबूड सर व श्री. नितिन म्हात्रे सर यांनी हा कार्यक्रम साजरा करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या खेलदिनामध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंद अतिशय द्विगुणित झाला होता.